17-06-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 6/17/2025 12:09 AM Page 1

निवडक

आई आयसीयूत असतानाही गंभीर इंग्लंड दौऱ्यात परतणार

नवी दिल्ली/लंडन, दि. १६ : भारतीय कसोटी संघाचा मेंटर गौतम गंभीर वैयक्तिक आपत्कालीन परिस्थितीनंतर इंग्लंड दौऱ्यावर पुन्हा परतणार आहे. त्याच्या आईला अचानक हृदयविकाराचा झटका आल्याने गंभीर काही दिवसांपूर्वी भारतात परतला होता . सध्या त्याच्या आईची प्रकृती स्थिर असून त्या अद्यापही आयसीयू मध्ये उपचार घेत आहेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, गंभीर सोमवारी रात्री पुन्हा इंग्लंडला रवाना होणार असून, २० जूनपासून सुरू होणाऱ्या पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी संघासोबत पुन्हा सहभागी होणार आहे. गंभीरने संघात पुनर्प्रवेश करण्याचा निर्णय घेतल्यामुळे या मालिकेचे महत्त्व अधोरेखित होते.

या मालिकेला विशेष महत्त्व आहे, कारण नुकत्याच रोहित शर्मा आणि विराट कोहली यांनी कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यामुळे संघ आता नव्या दमाच्या खेळाडूंवर अवलंबून आहे. फलंदाजीतील या दोन दिग्गजांच्या अनुपस्थितीत भारतासाठी इंग्लंडच्या कठीण परिस्थितीत स्वतःला सिद्ध करणे हे मोठे आव्हान ठरणार आहे.

शुभमन गिलच्या नेतृत्वाखालील नव्या संघासाठी ही मालिका केवळ सामना जिंकण्याचीच नव्हे, तर भारतीय कसोटी क्रिकेटच्या नव्या युगाची सुरुवात करण्याची संधी आहे.

इंग्लंड दौऱ्यातील पाच कसोटी सामने २० जूनपासून लीड्सच्या हेडिंग्ले मैदानावर सुरू होणार असून उर्वरित सामने एजबॅस्टन (बर्मिंगहॅम), लॉर्ड्स आणि द ओव्हल (लंडन) तसेच ओल्ड ट्रॅफर्ड (मँचेस्टर) येथे खेळवले जाणार आहेत. ही मालिका ऑगस्ट २०२५ पर्यंत चालणार आहे.

भारताचा कसोटी संघ – इंग्लंड दौरा २०२५–

कर्णधार: शुभमन गिल , उपकर्णधार: ऋषभ पंत,यशस्वी जैस्वाल,केएल राहुल,साई सुदर्शन,अभिमन्यू ईश्वरन,करुण नायर,नितीश रेड्डी,रवींद्र जडेजा,ध्रुव जुरेल,वॉशिंग्टन सुंदर,

शार्दुल ठाकूर,अर्शदीप सिंग,कुलदीप यादव,कृष्णा कृष्णा आणि दीपराज जडेजा

पीएसजीकडून अॅटलेटिको माद्रिदला ४-0 ने दणका

फिफा क्लब वर्ल्ड कप | बायर्न म्युनिकचा ऑकलंड सिटीवर १०-0 चा कहर

पासाडेना, दि. १६ :

फिफा क्लब वर्ल्ड कपच्या उद्घाटन सामन्यांत फ्रेंच चॅम्पियन पॅरिस सेंट-जर्मेन (पीएसजी) आणि जर्मन दिग्गज बायर्न म्युनिक यांनी जबरदस्त विजयी सुरुवात केली. अॅटलेटिको माद्रिदसारख्या बलाढ्य स्पॅनिश संघाला पीएसजीने ४-0 अशा गोलफरकाने हरवले, तर बायर्न म्युनिकने ऑकलंड सिटीवर १०-0 असा एकतर्फी विजय मिळवत आपली ताकद दाखवून दिली.

३२ संघांचा समावेश असलेल्या या नव्या क्लब वर्ल्ड कप स्पर्धेतील पहिल्याच पूर्ण दिवसात पीएसजी आणि बायर्नने प्रतिस्पर्ध्यांना कोणतीही संधी न देता वर्चस्व प्रस्थापित केले.

न्यूझीलंडमधील हौशी खेळाडूंनी सजलेला ऑकलंड सिटी संघ सिंड्रेला स्टोरी' ठरतोय, मात्र बुंडेसलिगा दिग्गज बायर्न म्युनिकने कोणतीही दया न दाखवता १०-0 ने धुव्वा उडवला. अमेरिकेतील सिनसिनाटी येथे झालेल्या या लढतीत जमाल मुसियालाने दुसऱ्या सत्रात बेंचवरून येत हॅटट्रिक साजरी केली, तर किंग्सले कोमन, मायकेल ओलिस आणि थॉमस म्युलर यांनी प्रत्येकी दोन गोल करत ऑकलंडला पूर्णपणे निष्प्रभ केलं.

बायर्नच्या विजयावर प्रतिक्रिया देताना प्रशिक्षक व्हिन्सेंट कॉम्पनी म्हणाले, स्पर्धेची सुरुवात चांगली झाली, पण पुढील आव्हाने अधिक कठीण असणार आहेत. आम्ही हे सामन्याला गांभीर्याने घेतल्याचे दाखवले, पण आता विनम्र राहणे महत्त्वाचे आहे.

ऑकलंडचे अंतरिम प्रशिक्षक इव्हान व्हिसलिच म्हणाले, जगातील सर्वोत्तम संघांपैकी एकाविरुद्ध खेळणे, हे आमच्या हौशी खेळाडूंना स्वप्नवत वाटले. आम्ही आमच्या खेळाडूंच्या प्रयत्नांवर अभिमान बाळगतो.

दरम्यान, रोझ बाउल (पासाडेना, कॅलिफोर्निया) येथे ८० हजारपेक्षा जास्त प्रेक्षकांच्या साक्षीने पीएसजीने अॅटलेटिको माद्रिदविरुद्ध आपल्या विजयी मोहिमेला सुरुवात केली. ३१ अंश सेल्सिअस तापमानात खेळत फ्रेंच चॅम्पियनने आक्रमक खेळाचे दर्शन घडवत ४-0 असा प्रभावी विजय मिळवला.

फॅबियन रुईझ आणि विटिन्हा यांनी पहिल्या सत्रात दोन झटपट गोल करत पीएसजीला मजबूत आघाडी मिळवून दिली. त्यानंतर सेनी मायुलु आणि ली कांग-इन यांनी शेवटच्या टप्प्यात गोल करत विजयावर शिक्कामोर्तब केले.

या विजयानंतर प्रशिक्षक लुईस एनरिके म्हणाले, आमचा उद्देश इतिहास घडविण्याचा आहे. हा नवीन अध्याय आहे आणि आमचा संघ, खेळाडू, चाहते सगळेच भुकेले आहेत. प्रत्येक स्पर्धेत शक्य तितके पुढे जायचे आणि जिंकायचे, हेच आमचे ध्येय आहे.

अॅटलेटिको माद्रिदचे प्रशिक्षक दिएगो सिमोन यांनी मात्र पराभवाचे खापर हवामानावर फोडण्यास नकार दिला. ते आमच्यापेक्षा सरस खेळले, त्यांच्या खेळाडूंमध्ये असाधारण गुणवत्ता आहे. म्हणूनच ते आज यशस्वी ठरले, असे सिमोन म्हणाले.

रविवारी न्यू जर्सीतील मेटलाइफ स्टेडियमवर झालेल्या ग्रुप ए सामन्यात ब्राझीलच्या पाल्मिरासने पोर्तो विरुद्ध 0-0 अशी बरोबरी साधली. दरम्यान, बोटाफोगो आणि सिएटल साउंडर्स यांच्यातील ग्रुप बी चा सामना उशिरा खेळवण्यात आला.

दक्षिण आफ्रिकेचा विजय हा टेम्बा बावुमाचा विजय

लंडन, दि. १६ :

लॉर्ड्सवर इतिहास रचला जात होता. स्टँडमध्ये उभे असलेले दिग्गज अश्रूंना वाट मोकळी करत होते. प्रसारण केंद्रांतून माजी खेळाडूंचे आवाज भरून आले होते. पण बाल्कनीत, दक्षिण आफ्रिकेच्या ऐतिहासिक विजयाच्या साक्षीदार ठरत असलेला टेम्बा बावुमा . डोकं हातात घेऊन शांत बसलेला . हे दृश्य जगाला फार काही सांगून गेलं.

दक्षिण आफ्रिकेचा आयसीसी वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपमधील पहिला खिताब आणि त्याच वेळी बावुमाचा जीवनप्रवास एका वळणावर आला. केपटाऊनच्या लंगा टाउनशिपमध्ये रस्त्यांवर क्रिकेट खेळणाऱ्या मुलाच्या डोक्यावर आता वर्ल्ड चॅम्पियनशिपचा मुकुट होता.

माझ्यासाठी, हा क्षण केवळ कृष्णवर्णीय आफ्रिकन कर्णधार म्हणून नव्हता, बावुमा म्हणाला . हा क्षण होता, जिथे मला देशासाठी काहीतरी विशेष करता आलं, आणि म्हणूनच मी त्याचा अभिमान बाळगतो. ही प्रेरणा आहे आणि मी आशा करतो की ती प्रेरणा म्हणून कायम राहील. असे त्याने भावनिक उद्गार काढले .

विजयानंतरच्या भावनांत बावुमा हरवून गेला होता . अंतिम सामन्यात त्याच्या पायात हॅमस्ट्रिंग दुखापत होती हीच ती दुखापत, ज्यामुळे २०२३ वर्ल्ड कप उपांत्य फेरीत त्यांच्यावर टिकाव धरता आला नव्हता. त्या वेळी त्याला जबर टीकेचा सामना करावा लागला होता.

या वेळीही संघ व्यवस्थापनाने त्याला मैदानावर उतरू नये असा सल्ला दिला. पण बावुमा ठाम होता .मी एडन (मार्कराम)सोबत निघणारच होतो. मी १००% तंदुरुस्त नव्हतो, पण मला वाटलं की मी माझं योगदान देऊ शकतो. व्यवस्थापनाच्या सल्ल्याविरुद्ध गेलो, आणि त्याचे परिणाम भोगण्याची पूर्ण तयारी होती,कदाचित अहंकाराचा निर्णय होता, पण तो क्षण महत्त्वाचा होता. २०२३ मध्ये जे घडलं, त्यानंतर ही संधी मी सोडू शकत नव्हतो. असं तो म्हणाला

लंगा टाउनशिपमध्ये टीव्हीवर लॉर्ड्स पाहणाऱ्या मुलाच्या कल्पनेतही तेथे खेळणे' हे स्वप्न नव्हते.मी कधीच लॉर्ड्सवर खेळण्याचा विचार केला नव्हता. आमच्यासाठी अशा गोष्टी अशक्यच वाटायच्या. पण मी इथे आहे देशासाठी गदा जिंकून. ही कहाणी कुणी लिहू शकत नाही, असं बावुमा म्हणाला .

त्याने जे काही गाठलं, ते सहज शक्य झालं नाही. संपूर्ण चॅम्पियनशिपमध्ये १३ डावांत त्याने ७११ धावा केल्या . दोन शतके, पाच अर्धशतके. तरीही, चर्चा नेहमी त्याच्यापेक्षा इतर खेळाडूंवर झाली.

२०१९ पासून दक्षिण आफ्रिका आयसीसी स्पर्धांमध्ये सतत अपयशी ठरत होती. चोकर्स' हा टॅग पिढ्यानपिढ्या चिकटून राहिला. पण या वेळी त्यांनी आठ सामन्यांत सात विजय मिळवत अंतिम फेरी गाठली आणि लॉर्ड्सवर ऑस्ट्रेलियासारख्या दिग्गज संघावर विजय मिळवला.

या विजयाचा केंद्रबिंदू ठरलेला बावुमा म्हणाला , मी हॅन्सी क्रोनिए, शॉन पोलॉक, एबी डिव्हिलियर्स यांना याच क्षणासाठी झगडताना पाहिलं आहे. मला माहित आहे की या क्षणापर्यंत पोहोचणं किती कठीण आहे.

जेव्हा तुम्ही एक नेता होता, तेव्हा तुम्हाला केवळ तांत्रिक किंवा शारीरिक तयारी पुरेशी नसते. मनाचा, आत्म्याचा संघर्ष असतो. आणि कधी कधी, तुम्ही फक्त थांबावं असं वाटतं,किंवा काहीतरी तुम्हाला थांबवतं . देश, कुटुंब, तुमचं स्वतःचं आत्मभान. हार मानणं हा पर्याय असतोच, पण तो स्वीकारणं ही गोष्ट नाही.

टेम्बा बावुमा केवळ पहिला कृष्णवर्णीय दक्षिण आफ्रिकन कर्णधार नाही, तर आता देशासाठी आयसीसी स्पर्धा जिंकणारा पहिलाच कर्णधार ठरला आहे. तो फक्त विजय नाही, तर एक प्रवास आहे – संघर्षाचा, आत्मविश्वासाचा, आणि प्रेरणेचा.

या विजयाचा झेंडा फडफडत असताना, बाल्कनीत डोकं खाली घालून शांत बसलेला बावुमा आठवेल . कारण तो क्षण देशासाठी होता. आणि कधीही न हार मानणाऱ्या मनासाठी.

तातजाना मारिया क्वीन्सच्या जेतेपदी

लंडन, दि. १६ :

टेनिसमध्ये अशक्य काहीच नाही, हे पुन्हा एकदा सिद्ध करत जर्मनीच्या ३७ वर्षीय तातजाना मारियाने पात्रता फेरीपासून सुरू झालेला आपला प्रवास थेट क्वीन्स क्लबच्या जेतेपदावर नेला. रविवारी झालेल्या अंतिम फेरीत मारियाने अमेरिकेच्या अमांडा अनिसिमोवाचा ६-३, ६-४ असा पराभव करत ' डब्ल्यूटीए – ५००' स्पर्धेतील सर्वात वयस्कर विजेती होण्याचा मान पटकावला.

या विजयाने तिला केवळ १ लाख २० हजार पौंडाचे पारितोषिकच मिळवून दिले नाही, तर विम्बल्डनपूर्वीचा आत्मविश्वासही दिला. विशेष म्हणजे ही क्वीन्स क्लब येथे झालेली १९७३ नंतरची पहिली महिला स्पर्धा होती, आणि रशियाच्या ओल्गा मोरोझोवानंतर (१९७२) येथे विजेतेपद पटकावणारी मारिया ही पहिली महिला ठरली.

मारियाचा विजय केवळ क्रीडाविश्वापुरताच मर्यादित नाही, तर तो एक प्रेरणादायक मानवी संघर्षदेखील आहे. दोन वेळा प्रसूतीसाठी ब्रेक घेतलेली आणि दोन मुलांची आई असलेली मारिया, या स्पर्धेत नऊ सामन्यांच्या पराभवानंतर आली होती. पात्रता फेरीतून मुख्य ड्रॉमध्ये प्रवेश करताना तिला दोन कडवे सामने पार करावे लागले.

त्यानंतर तिने सहाव्या मानांकित कॅरोलिना मुचोवा, चौथ्या मानांकित एलेना रायबाकिना आणि ऑस्ट्रेलियन ओपन विजेती मॅडिसन कीज यांना पराभूत करत अंतिम फेरी गाठली. तिची ही कामगिरी ही केवळ अनुभवाची कमाल नव्हे, तर सातत्य आणि दृढनिश्चयाची विलक्षण उदाहरण होती.

दुसरीकडे, अमेरिकेच्या २३ वर्षीय अमांडा अनिसिमोवासाठी हा सामना वेदनादायक ठरला. २०१९ मध्ये १७ व्या वर्षी फ्रेंच ओपन उपांत्य फेरीपर्यंत झेप घेतलेल्या या खेळाडूला मानसिक आरोग्याच्या अडचणींमुळे आठ महिन्यांचा ब्रेक घ्यावा लागला होता. तिने अलीकडेच कतार ओपन जिंकून पुनरागमन केलं होतं आणि झेंग किनवेनसारख्या दिग्गजाला हरवत आपली ताकद पुन्हा दाखवून दिली होती.

पण अंतिम सामन्यात मारियाच्या अनुभवासमोर अनिसिमोवाचा खेळ पुरला नाही. पहिल्या सेटमध्ये अनिसिमोवाच्या १० अनफोर्स्ड चुका आणि दुसऱ्या सेटमध्ये गोंधळलेल्या स्ट्रोकमुळे तिने स्वतःच आपल्यावर गदा आणली. मारियाने सातत्यपूर्ण चेंडू फिरवत आणि दबाव निर्माण करत सामना आपल्या बाजूने फिरवला.

या स्पर्धेतील जेतेपद हे मारियाच्या कारकिर्दीतील चौथे एकेरी विजेतेपद ठरले. तिने याआधी २०२३ मध्ये बोगोटामध्ये क्ले कोर्टवर आपले अंतिम विजेतेपद जिंकले होते. आता, २०१८ मध्ये अँजेलिक केर्बरनंतर डब्ल्यूटीए ५०० स्पर्धा जिंकणारी पहिली जर्मन खेळाडू होण्याचा बहुमानही तिने मिळवला आहे.

तिच्या विजयानंतर तिचे पती आणि दोन्ही कन्या, शार्लोट आणि सेसिलिया, कोर्टसाईडवरून तिच्या भावनात्मक क्षणाचे साक्षीदार ठरले.

गवतावरील खेळात खास कौशल्य दाखवणाऱ्या मारियासाठी हा विजय विम्बल्डनपूर्वी आत्मविश्वासाचा महत्त्वाचा इंजेक्शन ठरू शकतो. विम्बल्डनमधील तिची सर्वोत्तम कामगिरी २०२२ मध्ये उपांत्य फेरी गाठण्याची होती. यंदाच्या हंगामातही तिच्या अनुभवी आणि संघर्षशील खेळावर सर्वांचे लक्ष राहणार आहे.

Powerful, efficient and reliable 1.0/1.5 TSI engine

6-speed torque converter automatic AQ 250 7-speed DSG transmission

1 Year Complimentary SuperCare Package

Avail scrappage benefit against Certificate of Deposit**

Special benefits for Corporate and Government Employees

Selected variants available on CSD & GeM^

290+ touchpoints across India

Toll-free 1800 2700 260
www.skoda-auto.co.in

Safest car in its segment***

BNCAP Score for Kylaq:
Adult - 30.88 | Child - 45.00

5-star GNCAP rating for Kushaq & Slavia

Sales: Goa: (Taleigao) Emporium Automobile: 75740 44499; (Margao) Emporium Automobile: 75740 44499

Service: Goa: Emporium Automobile: 0832-2979733 / 34

Škoda T&C Apply. *Ex-showroom price. #Special benefits are applicable on selected variants and models for limited period and in limited quantity. **Scrappage benefit can be availed on select variants only. Check with your nearest dealership for more information. ^Stock subject to availability on CSD and GeM. Specification given differs from model to model. ***Sub-4 metre ICE vehicles, as per the BNCAP Rating. Delivery of the car is subject to stock availability. ##Terms and Conditions Apply. Please refer to www.skoda-auto.co.in for more information. All disputes are subject to Mumbai court's jurisdiction only.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २८५ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 285 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .